**मुंबई पोर्ट प्राधिकरण**

**सामान्य प्रशासन विभाग - कल्याण प्रभाग**

क्र. साप्रवि-कप्र/डब्लु-32/ 618          06 JUN 2022

प्रति,
सर्व विभाग प्रमुख
सर्व प्रभाग प्रमुख

विषय : मुंबई बंदराच्या 150 व्या वर्षपूर्तीच्या निमित्ताने आयोजित " **मुंबई बंदर गीत लेखन स्पर्धा** "

----------------

मुंबई बंदराच्या 150 व्या वर्षपूर्तीच्या निमित्ताने "मुंबई बंदराचा गौरवशाली इतिहास" या संकल्पनेवर आधारित "मुंबई बंदर गीत लेखन स्पर्धा " अध्यक्ष (प्रभारी) यांच्या इच्छेनुसार आयोजित करण्यात येत आहे. तदनुसार सुरुवातीला हे "मुंबई बंदर गीत" मराठीत लिहिण्यासाठी स्पर्धकांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे व त्यानंतर हिंदी, संस्कृत व इंग्रजी या भाषांमध्ये मुंबई बंदर गीत लेखन स्पर्धा आयोजित केली जाईल.

2. सदर "मुंबई बंदर गीत" लेखन स्पर्धेत भाग घेण्यासंबधी नियम व अटी खालील प्रमाणे आहेत -

i) स्वरचित मराठी गीतामध्ये मुखडयासहित (ध्रुवपदासहित) 3 ते 4 कडवी असावीत व प्रत्येक कडवे 4 ओळींचे असावे. गीत लयबध्द असावे जेणेकरुन कर्णमधुर संगीत देता येईल. तसेच गीताला संगीत देतांना थोडे फार फेरफार करण्यास गीतकारांची हरकत नसावी.

ii) प्रवेशिका दिनांक 7.06.2022 (सकाळी 10.00 ) ते दिनांक 16.06.2022 (रात्रौ 11.59) पर्यंत स्वीकारल्या जातील.

iii) खालील व्यक्ती स्पर्धेत भाग घेण्यास पात्र आहेत.

अ) सर्व मुंबई बंदर कर्मचारी वर्ग व त्यांच्यावर अवलंबून असणारे कुटुंबीय

ब) मुंबई बंदर निवृत्त कर्मचारी व त्यांचे पती - पत्नी

क) मुंबई बंदर कंत्राटदार व त्यांचे कर्मचारी

ड) दिनांक 01.06.2022 पूर्वी ज्यांना गोदी प्रवेश परवाना दिला आहे असे गोदी उपभोक्ता.

इ) श्री आर. के. रामगुडे, वरिष्ठ कल्याण अधिकारी हे सदर स्पर्धेच्या समन्वयाकरिता ' नोडल अधिकारी ' म्हणून नियुक्त केले आहेत तरी सर्व स्पर्धकांनी आपले स्वरचित गीत श्री आर. के. रामगुडे यांच्या ***rk.ramgude@mumbaiport.gov.in*** या इमेल आय.डी वर दिनांक 07.06.2022 (सकाळी 10.00) ते दिनांक 16.06.2022 (रात्रौ 11.59)पर्यंत पाठवावेत.

3. सदर स्पर्धेचे परीक्षक मुंबई बंदराच्या बाहेरील व्यक्ती असतील, जे आलेल्या प्रवेशिकांमधून गीताची निवड करतील. या स्पर्धेचा निकाल दिनांक 20.06.2022 रोजी घोषित केला जाईल. विजेते गीत मुंबई पत्तन प्राधिकरणाच्या वेब साईटवर दिनांक 26.06.2022 रोजी प्रक्षेपित केले जाईल तसेच विजेत्या गीत लेखकास रु.25000/- चे बक्षीस देण्यात येईल. विजेते गीत दिनांक 27.06.2022 रोजी मुंबई बंदराच्या कर्मचाऱ्यांद्वारे गायले जाईल. विजेत्या स्पर्धकाने गीताचे सर्व हक्क मुंबई पत्तन प्राधिकरणाच्या स्वाधीन करावेत..गीताचे सर्व हक्क मुंबई पत्तन प्राधिकरणाकडे सुरक्षित राहतील.

4. कृपया सदर परिपत्रकास कर्मचारी, पोर्ट उपभोक्ता व कंत्राटदार यांच्यामध्ये व्यापक प्रसिध्दि द्यावी, ही विनंती.

के. रामगुडे

कृते वरीष्ठ उप व्यवस्थापक (कल्याण)